NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

## बैठकीचा कार्यवृत्तात

दि. ३०/०५/२०१९ रोजी सकाळी ११: ०० वा. रँगिग विरोधी समितीची बैठक संपन्न झाली सदर बैठकीस खालील सन्माननिय अध्यक्ष व सदस्य उपस्थिती होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. प्र.कुलगुरू | सदस्य |
| २. | मा. श्रीमती. वैशाली शिंदे, पोलीस प्रशासन प्रतिनिधी | सदस्या |
| ३. | मा. टी. एम. लांडगे, स्थानिक माध्यम प्रतिनिधी (सकाळ) | सदस्य |
| ४. | श्री. उत्तम राक्षे, पालक प्रतिनिधी | सदस्य |
| ५. | श्री. महेश पवार, विद्यार्थ्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६. | मा. संचालक, विद्यार्थी विकास | सदस्य |
| ७. | मा. अधीक्षिका, मुलींचे वसतिगृह | सदस्या |
| ८. | मा. कुलसचिव | सदस्य सचिव |

उपरोक्त समितीची बैठक विद्यापीठ स्तरावर रँगिग प्रकार होवू नये तसेच महाविद्यालय स्तरावरील रँगिग समितीवर नियंत्रण व लक्ष ठेवण्यासाठी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार व राज्य सरकारने दिलेल्या वेळोवेळी निर्देशनाप्रमाणे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

**प्रास्ताविक,स्वागत व मार्गदर्शक :** प्रथमता मा.कुलसचिव महोदयांनी रँगिग विरोधी समितीच्या गठीत करण्यामागील पार्श्वभूमी व प्रयोजन सांगून सर्व उपस्थितांचे स्वागत केले तर मा. प्र. कुलगुरु महोदयांनी सर्व उपस्थित सदस्यांना मार्गदर्शन करतेवेळी सांगितले की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ चा समारोप होत आहे. समारोपच्या शेवटी रँगिग समितीची बैठक घेण्यात येत आहे. कारण सदरच्या वर्षांत एकही प्रकरण समिती समोर रँगिग संदर्भांतील आलेले नाही प्राप्त प्रकरणे निरंक असून, पुढील शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता १५ ऑगस्ट, २०१९ पूर्वी रँगिग विरोधी समिती पूनर्रगठीत करण्याचे सूचित केले तर १६ ऑगस्ट, २०१९ रोजी सकाळी ११:०० वा. बैठकीचे आयोजन करण्याचे ठरले.

प्रस्तुत विद्यापीठाच्या सर्व संलग्नित महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून रँगिग विरोधी समिती गठीत करून वर्षांतून किमान दोन बैठका घेवून त्याचा अनुपालन अहवाल विद्यापीठ स्तरावरील समितीला पाठविणे बंधनकारक केल्याचे परिपत्राकाव्दारे महाविद्यालयांना कळविण्याचे सर्वानुमते ठरले.

महाविद्यालयांनी दि. ३० जुलै, २०१९ पर्यंत रँगिग विरोधी कमिटी स्थापन करून त्याचा अहवाल विद्यापीठास सादर करावे जेणे करून विद्यापीठ स्तरावरील रँगिग विरोधी कमिटीच्या दि. १६ ऑगस्ट, २०१९ बैठकीत माहिती सादर करणे सूलभ होईल. तसेच रँगिग विरोधी गठीत केलेल्या समितीचे बोर्ड महाविद्यालयात तसेच विद्यापीठातील सर्व संकुलात दर्शनी भागात लावून त्याचे छायाचित्र अहवालासमवेत विद्यापीठास पाठविण्यात यावे. कारण विद्यापीठास अहवाल एकत्रित तयार करून शासनास पाठविणे सोईचे होईल.

महाविद्यालयातील विद्यार्थी / विद्यार्थीनीमध्ये रँगिग संदर्भांत त्यांच्यात जागृती होण्यासाठी पोलिस अधिकारा-यांचे प्रबोधनात्मक व्याखान ठेवण्यात यावेत असे सर्वानुमते ठरले.

बैठकीला उपस्थिती राहील्याबद्दल मा.अध्यक्ष व सन्मानीय सदस्याचे मा.कुलसचिव महोदयांनी अभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले.

30.5.19

(मा.प्रा.डॉ. वि.भा. घुटे)
कुलसचिव तथा रँगिग समिती सदस्य-सचिव

30/5/19

(मा.डॉ.शं.ई.पाटील)
प्र-कुलगुरू तथा अध्यक्ष